महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

**दिन विशेष...**
१८६६ : इलेक्ट्रॉनचे संशोधक रॉबर्ट अँड्युज मिलीकन यांचा जन्मदिन.
१९२८ : महाराष्ट्र साहित्य पत्रिकेची सुरुवात झाली.
१९४९ : माध्यमिक शालांत परीक्षेची सुरुवात.
१९४९ : जॉर्डन हा देश स्वतंत्र झाला.
१९७० : मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली.

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७४,५३२.९६ | +३२५.७२ (०.४४%) |
| डॉलर | ₹ ९४.०१ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३५ | १८ |
| दिल्ली | २७ | १७ |
| मुंबई | ३५ | २२ |
| नागपूर | ३३ | १८ |
| पुणे | ३५ | १५ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार , दि. २२ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १३० किंमत : ५ रु. | पाने ४

**सुविचार**
खरा आनंद तो आहे जो इतरांना सुख देण्यातून मिळतो. आपले आयुष्य हे आपल्या विचारांचे प्रतिबिंब आहे.

| सूर्योदय | - सूर्यास्त |
|---|---|
| स.-६:३० | संध्या-६:३९ |

**सोने – चांदी**

| सोने(१० ग्रॅम) | - चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५१,६९५/- | २,४५,०००/- |

# इराणच्या नतांज अणू प्रकल्पावर अमेरिका-इस्त्रायलचा भीषण हल्ला
## किरणोत्सर्गाचा धोका टळला ?

वृत्तसंस्था । तेहरान

**इराण आणि इस्त्रायलमधील युद्ध आता अत्यंत धोकादायक वळणावर पोहोचले आहे. अमेरिका आणि इस्त्रायलच्या सैन्याने संयुक्त कारवाई करत इराणच्या नतांज या मुख्य अणू प्रकल्पावर भीषण हल्ला केला आहे.**



मध्य पूर्वेतील तणाव दिवसेंदिवस वाढत जात असून आता इराणच्या नतांज परमाणू केंद्रावर भीषण हल्ला करण्यात आला आहे. अमेरिका आणि इस्त्रायलने संयुक्तपणे ही कारवाई केली असून यामुळे जगभर खळबळ माजली आहे. इराणच्या तस्निम या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, या हल्ल्यात नतांज संवर्धन केंद्राला निशाणा बनवलं आहे. हल्ल्याची तीव्रता इतकी भीषण होती की, या हल्ल्याचा आवाज सर्वदूर पसरला होता. प्राथमिक तपासानंतर इराणी अधिकाऱ्यांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. कारण आतापर्यंत कोणत्याही किरणोत्सर्गी पदार्थांची गळती झालेली नाही. याचा अर्थ अणू कचरा गळतीची सर्वांत मोठी भीती सध्यातरी नाही. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धसमाप्तीचे संकेत दिलेले असताना इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी मात्र युद्धविराम होणार नसल्याचं स्पष्ट केलंय. जपानच्या क्योडो न्यूजला दिलेल्या मुलाखतीत इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची म्हणाले की, अमेरिका आणि इस्त्रायलसोबतचे युद्ध संपवण्यासाठी तेहरानला केवळ युद्धविरामापेक्षा अधिक काहीतरी लागेल. आमचा संदेश हा आहे की हे युद्ध आमचे नाही. ते आमच्यावर लादले गेले आहे. आम्ही अमेरिकेशी वाटाघाटी करत असतानाच त्यांनी आमच्यावर हल्ला करण्याचा दावा केला आहे.

### ➢ इराणच्या विमानतळावरही हल्ला

**रॉयटर्सच्या वृत्तानुसार, इराणच्या लष्कराने शनिवारी इस्त्रायलच्या बेन गुरियन विमानतळावर विमानांना इंधन पुरवणाऱ्या टाक्यांवर ड्रोनद्वारे हल्ला केल्याचे सांगितले, असे देशाच्या सरकारी माध्यमांनी वृत्त दिले आहे.**

### ➢ निवासी रहिवासी सुरक्षित

**इराणी प्रसारमाध्यमांचा दावा आहे की, स्फोट होऊनही जवळच्या निवासी भागांतील रहिवासी सुरक्षित आहेत. सरकारने या लष्करी कारवाईचे वर्णन रणाचा अणुकार्यक्रम रोखण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या अमेरिका-इस्त्रायल मोहिमेचा एक भाग असे केले आहे. खरंतर नतांज अणूऊर्जा केंद्र हे शत्रूंचे नेहमीच लक्ष्य राहिले आहे. २०२५ पासून या स्थळाला अनेकवेळा लक्ष्य करण्यात आले आहे. प्रत्येकवेळी पायाभूत सुविधा आणि यंत्रसामग्रीचे नुकसान झाले आहे. परंतु, सुदैवाने पर्यावरणाची कोणतीही मोठी हानी झालेली नाही.**

# आधी परीक्षा, मग आयपीएल!
## श्रीलंकन बोर्डाचा कडक फतवा

वृत्तसंस्था । श्रीलंका

आयपीएल २०२६ मध्ये सहभागी होण्यासाठी सज्ज असलेल्या श्रीलंकन खेळाडूंना आता आपल्या बोर्डाच्या कडक नियमांना सामोरे जावे लागणार आहे. आधी तंदुरुस्ती सिद्ध करा, मगच आयपीएलला जा, असा फतवा श्रीलंका क्रिकेट बोर्डाने काढला आहे. यामुळे केकेआरचा स्टार वेगवान गोलंदाज मथिशा पथिराणा, लखनौचा वनिंदू हसरंगा आणि आरसीबीचा नुवान तुषारा यांच्या ना हरकत प्रमाणपत्रावर पेच निर्माण झाला आहे.

**पथिराणा एप्रिलच्या मध्यापर्यंत बाहेरच**

केकेआरने मोठ्या आशेने संघात घेतलेला मथिशा पथिराणा सध्या दुखापतीतून सावरत असून तो पुनर्वसन (Rehab) प्रक्रियेत आहे. बोर्डाच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, पथिराणा, हसरंगा आणि इशान मलिंगा यांची शारीरिक क्षमता चाचणी अद्याप झालेली नाही. हे खेळाडू टी-२० वर्ल्ड कप दरम्यान जखमी झाले होते. पथिराणा आयपीएलच्या सुरुवातीच्या सामन्यांना मुकणार हे आता निश्चित झाले असून, तो एप्रिलच्या मध्यापासूनच केकेआरसाठी उपलब्ध होऊ शकेल. दुसरीकडे, दिल्ली कॅपिटल्सच्या दुष्मंथा चमिरा आणि पथूम निसंका यांना बोर्डाने हिरवा कंदील दाखवला असून ते भारतात येण्यासाठी सज्ज आहेत. सनरायझर्स हैदराबादच्या कमिंदू मेंडिसलाही एनओसी मिळाली आहे. मात्र, नुवान तुषाराचा आयपीएल प्रवेश त्याच्या आगामी फिटनेस टेस्टच्या निकालावर अवलंबून असेल.

**बोर्डाचा फिटनेसवर विशेष भर**

श्रीलंका सरकारच्या क्रीडा मंत्रालयाने आणि नवीन निवड समितीने खेळाडूंच्या फिटनेसबाबत (पान २ वर)



## थोडक्यात



### दक्षिण कोरियात कारखान्याला भीषण आग

**नागपूर ।** दक्षिण कोरियात वाहनांच्या भागांची निर्मिती करणाऱ्या फॅक्टरीमध्ये लागलेल्या आगीत किमान ५३ जणांचा मृत्यू झाला. मृतांचा आकडा आणखी वाढू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. त्यांपैकी २४ जण गंभीर जखमी झाले असून, किमान १४ इतरांचा अधिकारी शोध घेत आहेत. जखमींपैकी कोणाची प्रकृती चिंताजनक आहे की नाही, हे अधिकारी तात्काळ निश्चित सांगू शकले नाहीत. परंतु आग वेगाने पसरल्याचे दिसत होते आणि प्रत्यक्षदर्शींनी स्फोटाचा आवाज ऐकल्याचे सांगितले. पळून जाण्याच्या प्रयत्नांदरम्यान इमारतीवरून उडी मारल्याने काही जण जखमी झाले.

### क्यूबा-अमेरिका यांच्यात डिझेलवरून तीव्र संघर्ष

**वाशिंग्टन ।** अमेरिका आणि क्यूबा यांच्यातील संबंध पुन्हा एकदा ताणले गेले आहेत. क्यूबाने हवाना येथील अमेरिकन दूतावासाला डिझेल आयात करण्याची परवानगी नाकारली आहे. या निर्णयामुळे दोन्ही देशांमधील कुटनीतिक तणाव आणखी वाढण्याची शक्यता आहे. क्यूबाचे राष्ट्राध्यक्ष मिगुएल दियाझ-कॅनेल बर्मुडेज यांच्या सरकारने हा निर्णय घेतला आहे. हवाना येथील अमेरिकन दूतावासाला त्यांच्या जनरेटरसाठी डिझेल आयात करायचे होते, कारण क्यूबामध्ये सध्या गंभीर ऊर्जा संकट सुरू आहे. वारंवार होणाऱ्या वीज कपातीमुळे दूतावासाचे दैनंदिन कामकाजही प्रभावित होत आहे.

### अक्कलकुवा पंचायत समितीतील अभियंता एसीबीच्या जाळ्यात

**अक्कलकुवा ।** मंजूर घरकुलाचे फोटो अपलोड करण्याच्या मोबदल्यात एक हजारांची लाच स्वीकारताना अक्कलकुवा पंचायत समितीतील ग्रामीण गृहनिर्माण विभागाचा कंत्राटी अभियंता नरेश देविदास बोरसे यास नंदुरबार एसीबीने रंगेहाथ अटक केली. तक्रारदाराच्या चुलत भावाच्या नावाने जामली, ता.अक्कलकुवा येथे घरकूल मंजूर असून दुसऱ्या हप्त्याचे ७० हजारांचे अनुदान मंजूर होणार असल्याने आरोपी नरेश बोरसे यास घराचे फोटो काढून शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याचे काम होते.या कामासाठी एक हजारांची लाच मागितली होती. नंदुरबार एसीबीने सापळा रचून आरोपीला अटक केली. ही कारवाई सपोनि विलास पाटील, हवालदार विजय ठाकरे, देवराम गावीत, नरेंद्र पाटील, जितेंद्र महाले, हेमंतकुमार महाले यांनी केली.

# पाणी कुठपर्यंत मुरलंय ते कळू द्या
## भोंदूबाबा अशोक खरातप्रकरणावर उद्धव ठाकरेंचं परखड भाष्य

वृत्तसंस्था । मुंबई

**राजधानी मुंबईत एक्सपोर्ट इम्पोर्ट लॉजिस्टिक कोर्सचा शुभारंभ माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याहस्ते करण्यात आला. या कार्यक्रमानंतर पत्रकार परिषदेच्या माध्यमातून त्यांनी लॉजिस्टिक कोर्स सुरू करण्याच्या उद्देशासह राज्यातील राजकीय परिस्थिती, भोंदूबाब प्रकरणासह विविध विषयावर भाष्य केलं.**



राज्यात गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या भोंदूबाबा अशोक खरातसंदर्भात विचारलेल्या प्रश्नावरही उद्धव ठाकरेंनी उत्तर दिलं. ओम फट स्वाहा.. म्हणत राज्यातील भोंदूबाबांवर (अशोक खरात)वर कारवाई झाली पाहिजे, असे आवाहन त्यांनी मुख्यमंत्र्यांना केले.

भोंदूबाबा अशोक खरात संदर्भातील प्रश्नावर उत्तर ठाकरेंनी आपली भूमिका मांडली. अजून किती खालच्या पातळीवर आपण उतरणार आहोत. जादूटोणा विरोधी कायदा आपल्याकडे आहे, पण कायद्याचे पालन करणारेच त्यांच्या नादी लागणार असतील, तर त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे. आम्ही महाराष्ट्रला पुढे नेणार आहोत, हा विषय घेऊन पुढे जातोय. पण, टाचण्या, लिंबाचा विषय समोर आलाय हे योग्य नाही. एपस्टीन फाईलमधून कोणाचं लक्ष उडू नये यासाठी सगळ्या गोष्टी सुरू आहेत. अनेक फोटो आणि नावं समोर येत आहेत, ज्यांचं कर्तृत्व नाही त्यांना असे मार्ग घ्यावे लागतात, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले.

महाविकास आघाडी सरकारने पाणी देऊन मदत केली. महाविकास आघाडीच्या सरकारमध्येही या भोंदूबाबाला मदत झाली यासंदर्भातही उद्धव ठाकरेंनी भाष्य (पान २ वर)

# अमोल वालगुडेची सुवर्ण हॅटट्रिक !

वृत्तसंस्था । पुणे

पुणे जिल्ह्यातील वाघोली येथे सुरू असलेल्या ६८ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत माती आणि गादी विभागातील ६१ आणि ७९ किलो वजनी गटांचे निकाल जाहीर झाले आहेत. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या या लढतींमध्ये कोल्हापूर, सोलापूर आणि पुण्याच्या मल्लांनी सुवर्णपदकांवर आपली मोहोर उमटवली आहे. स्व. अजितदादा पवार क्रीडानगरीत रंगलेल्या ६८ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत शुक्रवारी सुवर्णपदकांसाठी मल्लांमध्ये निकराची झुंज पाहायला मिळाली. या स्पर्धेत पुण्याच्या अमोल वालगुडेने सलग तिसऱ्यांदा सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला आहे, तर सोलापूरच्या बिरुदेव बनसोडेने शेवटच्या क्षणी बाजी मारत सुवर्णपदक पटकावले.

# कॅप्टनवर छत्री, पदाला कात्री : रुपाली चाकणकरांचा अखेर राजीनामा

वृत्तसंस्था । पुणे

**नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्यानंतर राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणाने आता मोठे राजकीय वळण घेतले असून, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी अखेर आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.**



गेल्या दोन दिवसांपूर्वीच रुपाली चाकणकर यांचे कॅप्टन खरातच्या डोक्यावर छत्री धरलेले फोटो व्हायरल झाले होते. रुपाली चाकणकर यांच्या पदालाच या कॅप्टनमुळे कात्री लागली आहे.

या प्रकरणात रुपाली चाकणकर यांचा अशोक खरातची पाद्यपूजा करतानाचा व्हिडिओ तसेच त्याच्यासोबतचे काही फोटो समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. या पार्श्वभूमीवर त्यांच्यावर सर्व स्तरातून टीकेची झोड उठली होती. विरोधकांनी त्यांच्या तात्काळ राजीनाम्याची जोरदार मागणी केली होती.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडूनही त्यांना राजीनामा देण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती समोर आल्यानंतर चाकणकर यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेत आपला राजीनामा सुपूर्द केला. विशेष म्हणजे, त्याआधी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा बंगल्यावर भेट घेतली होती. रुपाली चाकणकर यांनी आपल्या राजीनाम्यानंतर सोशल मीडियावर प्रतिक्रिया देताना म्हटले की, माझ्याकडे असलेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा मी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे सुपूर्द केला आहे. या प्रकरणी होत असलेल्या आरोपांची निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी व्हावी, (पान २ वर)

# केरळसाठी भाजपकडून मास्टर प्लॅन!
## विधानसभा निवडणुकीसाठी भाजपकडून रणनीती

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगाने १५ मार्च २०२६ रोजी केली. यामध्ये आसाम, केरळ, पुदुच्चेरी (केंद्रशासित प्रदेश), तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल या राज्यांचा समावेश आहे. त्यामुळे हालचालींना वेग आला आहे. भाजपकडून केरळ राज्यात ऐतिहासिक विजय मिळवण्याच्या दृष्टीने रणनिती आखली जात आहे.**



केरळ राज्यात विधानसभेच्या १४० जागा आहेत. निवडणुक आयोगाने पाच राज्यांमध्ये निवडणुकीची घोषणा केल्यानंतर त्या ठिकाणी आचारसंहिता लागू झाली आहे. दक्षिणेकडील तमिळनाडू आणि केरळ ही दोन महत्वाची राज्ये आहेत. या दोन्ही ठिकाणी भाजपची सत्ता नाही. त्यामुळे या राज्यात सत्ता आणण्यासाठी भाजपकडून व्यूहरचना आखली जात आहे. केरळमध्ये सध्या Left Democratic Front (LDF) ची सत्ता आहे. मुख्यमंत्री पिनराई विजयन आहेत. ते २०१६ पासून केरळचे मुख्यमंत्री आहेत आणि २०२१ च्या निवडणुकीत एलडीएफने पुन्हा बहुमत मिळवले, त्यामुळे ते दुसऱ्यांदा सत्तेत आले आहेत. एलडीएफच्या विधानसभेत ९७ जागा आहेत. त्यामुळे भाजपची केरळ राज्यात सत्ता आणण्याठीची शक्यता दुसर दिसत असून निवडणुकीत मोठा कस लागणार असल्याचे सांगितले जाते. असे असले तरी केरळ विधानसभा (पान २ वर)

### स्थानिक मुद्दे अन् विकासावर फोकस

अभिनेते-राजकारणी सुरेश गोपी यांचा त्रिशूर लोकसभा मतदारसंघातून निवडून आले. त्यांनी तब्बल ७०,००० हजार मतांच्या फरकाने विजय मिळवला. यानंतर डिसेंबरमध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपने तिरुवनंतपुरम महानगरपालिकेवर सत्ता स्थापन केली आहे. भाजपसाठी हे यश महत्वाचे असून, विधानसभा निवडणुकीसाठी पक्षातील नेत्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. या निवडणुकीत भाजपकडून स्थानिक मुद्यांवर लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. त्यामुळे केरळ विधानसभा निवडणुकीत भाजपकडून कोणते राजकीय डावपेच खेळले जातात हे पाहणे महत्वाचे असणार आहे.

# निवडणूक कामात हलगर्जीपणा; ७ बीएलओंविरुद्ध गुन्हे दाखल

प्रतिनिधी । जळगाव

**मतदार यादी दुरुस्तीच्या कामात वारंवार सूचना देऊनही टाळाटाळ आणि विलंब केल्याप्रकरणी जळगाव जिल्हाधिकाऱ्यांनी कडक पाऊल उचलले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार शहरातील सात बीएलओंविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात दि.२० मार्च रोजी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतदार याद्यांच्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत दिलेली कामे वेळेत पूर्ण न केल्याने दोषी आढळलेले कर्मचारीमध्ये महानगरपालिकेचे लिपिक, विविध शाळांचे शिक्षक आणि अंगणवाडी सेविकांचा समावेश आहे. संबंधित कर्मचाऱ्यांना सप्टेंबर २०२५ पासून वेळोवेळी बैठका आणि व्हॉट्सप ग्रुपद्वारे सूचना देण्यात आल्या होत्या, तरीही त्यांनी कामात प्रगती दाखवली नाही.

### शिक्षक, महापालिका लिपिक, अंगणवाडी सेविकांचा समावेश

**गुन्हे दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांची नावे**

विकास सावळे (लिपिक, मनपा), संजय रामदास सपकाळे (लिपिक, मनपा), तौसीफ शेख गणी (शिक्षक, अलहिला स्कूल), विमल सुपडू भारसके (अंगणवाडी सेविका), रवींद्र अशोक कोळी (शिक्षक, रावसाहेब राऊत विद्यालय), आरिफ खान इस्माईल खान (शिक्षक, मिल्लत स्कूल), राहुल सुरेश धनगर (शिक्षक, बालविश्व विद्यालय). निवडणूक कामाचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी ५ आणि १७ मार्च (पान २ वर)

शौर्य मराठी — महाराष्ट्राचे निडर दैनिक
epaper.shauryamarathi.com



## संपादकीय

### लोकशाही मूल्यांचा विचार आवश्यक

महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक २०२६ बाबत सुरू असलेली चर्चा ही केवळ कायद्याची किंवा राजकारणाची बाब नाही, तर ती भारतीय समाजाच्या मूलभूत रचनेला, वैयक्तिक स्वातंत्र्याला, सामाजिक विषमतेला आणि राज्याच्या भूमिकेला स्पर्श करणारी आहे. धर्म, ओळख आणि सत्ता यांचे परस्पर संबंध लक्षात घेतले, तर महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक २०२६ या विधेयकाचे विश्लेषण करताना संतुलित आणि समालोचनात्मक दृष्टिकोन स्वीकारणे अत्यावश्यक ठरते. या विधेयकाचा मुख्य उद्देश जबरदस्ती, फसवणूक किंवा प्रलोभनाद्वारे होणारे धर्मांतर रोखणे हा सांगितला जातो. वरकरणी पाहता हा उद्देश लोकशाही मूल्यांशी सुसंगत वाटतो, कारण कोणत्याही व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आघात होऊ नये, हे राज्याचे कर्तव्य आहे. मात्र, या उद्देशाच्या अंमलबजावणीतून निर्माण होणारे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे आहेत. भारतीय समाजात धर्म हा केवळ श्रद्धेचा विषय नसून तो सामाजिक ओळख, सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक स्थानाशी घट्ट जोडलेला आहे. त्यामुळे धर्मांतर ही केवळ वैयक्तिक निवड नसून ती सामाजिक परिणाम घडवणारी प्रक्रिया आहे. इतिहासात पाहिले असता, अनेक वंचित समुदायांनी धर्मांतराचा वापर सामाजिक सन्मान, समानता आणि प्रतिष्ठा मिळवण्यासाठी केला आहे. दलित आणि आदिवासी समाजासाठी धर्मांतर हे अनेकदा दडपशाहीतून मुक्त होण्याचे साधन ठरले आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक २०२६ चा विचार केला तर समर्थकांचे म्हणणे असे आहे की काही ठिकाणी गरीब, आदिवासी किंवा सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आर्थिक किंवा सामाजिक प्रलोभने देऊन धर्मांतरास प्रवृत्त केले जाते. त्यामुळे त्यांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर आघात होतो आणि अशा अनैतिक धर्मांतराला रोखण्यासाठी कायदेशीर चौकट आवश्यक आहे. त्यांच्या मते, हा कायदा व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यासाठी आहे. परंतु या भूमिकेच्या समोर विरोधक काही गंभीर प्रश्न उपस्थित करतात. प्रलोभन, जबरदस्ती आणि फसवणूक या संकल्पनांची व्याख्या अत्यंत अस्पष्ट आहे. जर एखादी संस्था शिक्षण, आरोग्य सेवा किंवा आर्थिक मदत देत असेल आणि त्यातून काही लोक प्रभावित होऊन धर्म बदलत असतील, तर ते प्रलोभन ठरेल का? की ते सामाजिक सेवा मानायचे? या संकल्पनांची स्पष्ट व्याख्या नसल्यामुळे कायद्याच्या अंमलबजावणीत मनमानी होण्याची शक्यता वाढते. जेव्हा कायद्याच्या संकल्पना अस्पष्ट असतात, तेव्हा त्या सत्ताधाऱ्यांच्या व्याख्यांवर अवलंबून राहतात. यामुळे कायदा संरक्षणाचे साधन न राहता नियंत्रणाचे साधन बनण्याचा धोका निर्माण होतो. धर्मांतरविरोधी विधेयक हे अशा प्रकारच्या नियामक सत्तेचे उदाहरण ठरते. जेव्हा राज्य व्यक्तीच्या वैयक्तिक श्रद्धांवर आणि निवडीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करते, तेव्हा ते लोकशाहीतील मूलभूत स्वातंत्र्यावर परिणाम करणारे ठरू शकते. धर्मांतरविरोधी विधेयकाभोवती निर्माण होणारे सामाजिक वातावरणही महत्त्वाचे आहे. लव्ह जिहाद सारख्या संकल्पनांच्या माध्यमातून समाजात भीती आणि संशयाचे वातावरण तयार केले जाते. एखाद्या मुद्द्याला अतिशयोक्तीपूर्ण स्वरूप देऊन समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण केली जाते. याचा परिणाम असा होतो की आंतरधर्मीय विवाह आणि नातेसंबंधांकडे संशयाने पाहिले जाते. ही परिस्थिती व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्यावर सामाजिक आणि राजकीय नियंत्रण वाढवते. परिणामी, समाजात ध्रुवीकरण वाढते आणि सामाजिक सलोखा धोक्यात येतो. धर्मांतराचा प्रश्न हा केवळ धार्मिक नसून सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटकांशीही जोडलेला आहे. एका बाजूला जबरदस्तीचे धर्मांतर रोखणे आवश्यक आहे, तर दुसऱ्या बाजूला व्यक्तीच्या निवडीचा आणि स्वातंत्र्याचा आदर राखणे तितकेच महत्त्वाचे आहे. याविषयावर विचार करताना केवळ कायद्याच्या चौकटीत न राहता व्यापक सामाजिक वास्तव, ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि लोकशाही मूल्यांचा विचार करणे आवश्यक आहे.

# जळगावात 'योगिनी' शक्तीचा जागर!

## योगक्षेत्रातील ३५ कर्तृत्ववान महिलांना 'योगिनी पुरस्कार-२०२६' प्रदान

प्रतिनिधी । जळगाव

**गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर जळगाव शहरात योग आणि महिला शक्तीचा अभूतपूर्व संगम पाहायला मिळाला. महाराष्ट्र योगशिक्षक संघ, जळगाव जिल्हा समितीच्यावतीने आयोजित योगिनी पुरस्कार २०२६ सोहळा दि.१९ मार्च रोजी मु. जे. महाविद्यालयाच्या आनंदयात्री योग हॉलमध्ये उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून समाजाला आरोग्य आणि सकारात्मक जीवनमूल्ये देणाऱ्या ३५ महिलांचा सन्मान करण्यात आला.**



या कार्यक्रमात योगक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ३५ महिलांना त्यांच्या योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले. चार वर्षांपूर्वी गुढीपाडव्याला संघाची स्थापना झाली होती. त्यानिमिताने संघाच्या चौथ्या वर्धापनदिनी योगिनी पुरस्कार देऊन महिलांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे अध्यक्ष हठयोगिनी चित्रा महाजन यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषवले. संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार आणि राज्य कार्यकारी अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि अर्चना गुरव यांच्या गुरुवंदनाने झाली. या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी संस्थापक सदस्य डॉ.कृणाल महाजन यांनी पार पाडली. कार्यक्रमाची प्रस्तावना योगशिक्षण समितीचे प्रमुख डॉ. देवानंद सोनार यांनी केली, तर आभार विभागप्रमुख सुनील गुरव यांनी मानले. यशस्वीतेसाठी पांडुरंग सोनार, नूतन जोशी, सोनाली पाटील, पल्लवी उपासनी, रोहन चौधरी, कैलास पाटील यांच्यासह जिल्हा समितीच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### योगसाधनेचे महत्त्व

प्रमुख पाहुण्या के.सी.ई. सोसायटीच्या शैक्षणिक संचालिका आणि सोलापूर विद्यापीठाच्या माजी कुलगुरू ज्ञानयोगिनी डॉ. मृणालिनी फडणवीस उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या अमृत वचनातून योगसाधनेचे महत्त्व विशद केले. तसेच प्रमुख अतिथी म्हणून आरोग्यभारती देवगिरी प्रांताच्या उपाध्यक्ष कर्मयोगिनी डॉ. लीना पाटील यांनी महिलांना आरोग्याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

### सकारात्मक जीवनमूल्ये देणाऱ्या महिलांचा सत्कार

**आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून समाजाला आरोग्य आणि सकारात्मक जीवनमूल्ये देणाऱ्या ३५ महिलांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यामध्ये चित्रा महाजन, अर्चना गुरव, नूतन जोशी, स्वाती निकम, सोनाली पाटील, पल्लवी उपासनी, सोनल महाजन, शीला रावत, शालिनी देसले, शीतल पाटील, चित्रा आसोदेकर, दीपा कोल्हे, पूजा महाजन, वैशाली दामोदरे, मृदुला कुलकर्णी, हेमांगिनी सोनावणे यांच्यासह जया सपकाळे, संध्या कुलकर्णी, नेहा कारेकर-गुरव, स्नेहा कुळकर्णी, वैशाली भारंबे, डिम्पल रडे, गौरी पाटील, प्रिया दारा, क्रांती गुरव, सीमा पाटील, अर्चना जळगाववाला, ज्योती हरेल, मनीषा कोरके, कविता चौधरी, कविता सोनार, नेहा तळेले, निशिता रंगलानी, स्मिता पिले आणि रुद्राणी देवरे या महिलांनाही सन्मानित करण्यात आले.**

# पंच परिवर्तनातून गोदातिरी १५ हजार चौ.फुटांची साकारली भव्य महारांगोळी




प्रतिनिधी । नाशिक

**हिंदू नववर्ष स्वागत महोत्सवानिमित्त नाशिक महापालिका व नववर्ष स्वागत यात्रा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने गोदातीर परिसरात पंच परिवर्तन हेच समाज परिवर्तन या संकल्पनेवर आधारित भव्य महारांगोळी साकारण्यात आली. स्वबोध, सामाजिक समरसता, नागरिक शिष्टाचार, कुटुंब प्रबोधन आणि पर्यावरण या पंचसूत्रीचा प्रभावी संदेश देण्यात आला.**

सुमारे १५ हजार चौरस फुट क्षेत्रफळ असलेली ही महारांगोळी तब्बल सव्वा दोनशे महिलांनी एकत्र येऊन साकारली. या भव्य कलाकृतीसाठी अंदाजे ८०० किलो रांगोळी व २२०० किलो रंगांचा वापर करण्यात आला असून, अवघ्या चार तासांत ही रांगोळी पूर्ण करण्यात आली. महारांगोळीचा शुभारंभ प्रभाग क्रमांक ५ च्या नगरसेविका चंद्रकला धुमाळ व नीलम पाटील, प्रभाग क्रमांक १२ च्या नगरसेविका ठाकरे, सहायक पोलीस आयुक्त अद्विता शिंदे, शहर वाहतूक शाखेच्या तृप्ती देशपांडे यांच्या हस्ते प्रथम बिंदू रेखाटून करण्यात आला.या प्रसंगी संस्कार भारतीचे अखिल भारतीय भू-अलंकरण प्रमुख रघुराज देशपांडे उपस्थित होते. प्रास्ताविक रचनाकार निलेश देशपांडे यांनी केले, तर आभार समितीचे अध्यक्ष शिवाजी बोंडार्डे यांनी मानले. सूत्रसंचालन आसावरी धर्माधिकारी यांनी केले.

## सिंधी दिवसानिमित्त शंभर दात्यांचे रक्तदान

प्रतिनिधी । धुळे

शहरातील कुमारनगर परिसरात पूज्य सिंधी जनरल पंचायत ट्रस्ट, भगवान झुलेलाल मंदिर ट्रस्ट व झुलेलाल सोसायटी परिसर यांच्या संयुक्त विद्यमाने सिंधी दिवसानिमित्त रक्तदान शिबीर घेण्यात आले. शंभरपेक्षा अधिक दात्यांनी रक्तदान केले.

यशस्वीतेसाठी भगवान झुलेलाल मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष गुलशन उदासी, उत्तम वच्छाणी, किशोर डीयालानी, राजेश वलेजा, देवानंद नानकाणी, देवानंद खिलवाणी, महेंद्र जीठानी, अनिल पोपटानी, ओम खटवानी, तनुकुमार दूसेजा, तुलसी रिजवानी यांच्यासह समाजबांधवांनी परिश्रम घेतले.

# मेहरुण येथील जैन ड्रीम स्पेसेसच्या क्रीडांगणावर टी-२० चा रंगणार थरार

## जैन इरिगेशनचे सहव्यवस्थापकिय संचालक अतुल जैन यांची माहिती

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्यावतीने जळगाव क्रिकेट लीग (जेसीएल) २०२६ - पर्व २ चे भव्य आयोजन करण्यात येणार असून मेहरुण येथील जैन ड्रीम स्पेसेसच्या क्रीडांगणावर टी-२० चा सामना रंगणार आहे. या स्पर्धेची अधिकृत घोषणा संघटनेचे अध्यक्ष तथा जैन इरिगेशनचे सहव्यवस्थापकिय संचालक अतुल जैन यांनी केली आहे.**

यावेळी व्यासपीठावर अॅड. सुरज जहागिर, उपाध्यक्ष युसूफ मकरा, सचिव अरविंद देशपांडे, खजिनदार राजेंद्र लढ्ढा यांची उपस्थिती होती. आयपीएलच्या धर्तीवरील नियमावलीसह आयोजित करण्यात येणारी ही

जळगाव क्रिकेट लीग - जेसीएल २०२६ (पर्व २) स्पर्धा होणार असून आयोजक जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनने केले आहे. जैन ड्रीम स्पेसेस कांताई नगर मेहरुण येथे इंडियन प्रीमियम लीगच्या धर्तीवर टी-२० क्रिकेट स्पर्धा होणार आहे. पांढरा लेदर बॉल, खेळाडूंचे रंगीत कपडे, दिवस रात्रीचे क्रिकेट सामने होणार आहे.

स्पर्धा मेहरुण परिसरातील कांताई नगर येथील जैन ड्रीम स्पेसेस क्रीडांगणावर खेळविण्यात येणार आहे. या स्पर्धेमुळे जळगाव शहरात पुन्हा एकदा क्रिकेटचा उत्साह आणि जल्लोष अनुभवायला मिळणार आहे.

Own The Game, Lead The League, Build Legacy अर्थात खेळावर आपले स्वामित्व मिळवा, लीगचे नेतृत्व करा आणि कायमस्वरूपी वारसा निर्माण करा, या घोषवाक्याखाली होणारी ही लीग जळगावसह संपूर्ण कान्हदेशातील उदयोन्मुख क्रिकेटपटूंना आपली प्रतिभा सिद्ध करण्याची सुवर्णसंधी देणार आहे. ही स्पर्धा पांढऱ्या लेदर बॉलवर खेळविण्यात येणार असून स्थानिक खेळाडूंना मोठ्या स्तरावर खेळण्याचे हक्काचे व्यासपीठ मिळणार आहे. या लीगच्या माध्यमातून स्थानिक खेळाडूंना प्रोत्साहन देणे, क्रिकेटचा दर्जा उंचावणे आणि जळगावच्या क्रीडा संस्कृतीला चालना देणे हा मुख्य उद्देश असल्याचे अध्यक्ष अतुल जैन यांनी यावेळी सांगितले. जळगाव क्रिकेट लीग ही केवळ स्पर्धा नसून जळगावकरांसाठी क्रिकेटचा उत्सव ठरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**कान्हदेशातील खेळाडूंना व्यासपीठ**

नवा जोश, नव्या थरारासह जळगाव क्रिकेट टि-२० लीग तयार! खेळाची ताकद, जळगावची शान म्हणून याकडे बघितलं जाते. जळगाव व कान्हदेशातील क्रिकेटपटूंना मोठ्या व्यासपीठावर खेळण्याची संधी मिळावी आणि स्थानिक खेळाडूंना चालना मिळावी, या उद्देशाने जळगाव क्रिकेट लीगचे आयोजन करण्यात आले आहे. मैदानावर दमदार खेळाचे प्रदर्शन होईल आणि जळगावचा गौरव वाढेल.

जळगाव क्रिकेट लीगचा खेळाडूंसाठी खेळाचा, व्यावसायिकांसाठी व्यवसायाचा मौका या स्पर्धेत जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनने जाहीर केलेल्या खेळाडूंनाच त्यांनी नोंदणी केल्यानंतर खेळता येईल, असेही संघटनेतर्फे नमूद करण्यात आले आहे.

## पान १ वरुन

**आधी परीक्षा, मग......**

कठोर भूमिका घेतली आहे. मे महिन्यापर्यंत श्रीलंकेचा कोणताही आंतरराष्ट्रीय सामना नसल्याने, हा काळ खेळाडूंचा फिटनेस स्तर उंचावण्यासाठी वापरला जात आहे. यामुळेच आयपीएल फ्रँचायझींना आपल्या स्टार खेळाडूंसाठी काही काळ वाट पाहावी लागणार आहे.

**कॅप्टनवर छत्री, पदाला......**

यासाठी नैतिक जबाबदारी स्वीकारत मी हा निर्णय घेतला आहे. भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणामुळे राज्यातील राजकारण तापले असून, या प्रकरणाची चौकशी आणि पुढील राजकीय घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. रुपाली चाकणकर यांची बदनामी करु नका असे वक्तव्य काँग्रेस नेते अरविंद शिंदे यांनी केले आहे. त्यानंतर पक्षाचे वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे यांनी हे त्यांचे वैयक्तिक मत असल्याचे म्हटले आहे.तसेच नाशिकच्या खरातच जे प्रकरण आम्हाला दिसतय. त्यामध्ये खरातवर कारवाई झाली पाहिजे. अशा व्यक्तीला बाहेर सोडलाच नाही पाहिजे ही आमची पहिली भूमिका आहे. पण खरातला बाजूला ठेऊन रुपाली चाकणकर यांच्यावर जो निशाणा साधला जातोय. यात स्पष्टपणे राजकीय गणित दिसत आहेत, असा संशय त्यांनी व्यक्त केला आहे.

**पाणी कुठपर्यंत मुरलंय......**

केलं. माझं काहीही म्हणणं नाही, तुम्ही सगळ्यांची चौकशी करा. कारण, पाणी कुठपर्यंत मुरलंय ते कळू द्या, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी महाविकास आघाडी सरकारच्या काळात भोंदू बाबाला पाणी देण्यासाठी केलेल्या मदतीवरूनही स्पष्टीकरण दिले. तसेच, यानिमित्ताने गावोगावी असलेल्या भोंदूबाबांवर कारवाई झाली पाहिजे, त्यांच्याकडे कुठल्याही पक्षाचा झेंडा असला तरी कारवाई झाली पाहिजे, अगदी ओम फट स्वाहा.. असे म्हणत उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांना आवाहन केले आहे. विधिमंडळ अधिवेशनात विरोधकांनी आता पुरव्यानिशी अनेक भ्रष्टाचार बाहेर काढले आहेत. जे जे ढोंगी आहेत त्यांचे एक पांघरुन घातलं जातंय, आता मुख्यमंत्र्यांनी हे पांघरुन बाहेर काढलं पाहिजे, असेही उद्धव ठाकरेंनी म्हटलं. दरम्यान, सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीत झालेल्या मारहाणीवरूनही त्यांनी भाष्य केलं. आता, त्यांच्या लक्षात येईल की, रेड्याप्रमाणे लोकशाही देखील कापली जाते, असे उत्तर ठाकरेंनी दिले. लॉजिस्टिक कोर्स सुरू करण्याचा उद्देश - २३ जानेवारीला बाळासाहेब ठाकरे यांचं जन्मशताब्दी वर्ष सुरु झालं असून तेव्हाच मी जाहीर केलं होत की, मराठी लोकांसाठी आम्ही एक पाऊल पुढे आणत आहोत. स्थानिक भूमीपुत्रांना दारं बंद होती, त्यामुळे आम्ही नुसती आंदोलन नाही केलं तर प्रशिक्षण वर्गदेखील सुरु केली. सध्या कंपन्यांत कुशल मराठी आणि मुलं लागतात, त्यांना पात्र बनवण्यासाठी आम्ही प्रशिक्षण सुरु केलं आहे. आजकाल लॉजिस्टिक मोठ्या प्रमाणावर आहे. नवी मुंबई एअरपोर्ट आहे, तिथल्या भूमी पुत्रांना संधी असेल तर त्यांना ती मिळाली पाहिजे, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी लॉजिस्टिक कोर्सच्या शुभारंभाचा उद्देश सांगितला.

**निवडणूक कामात हलगर्जीपणा;......**

रोजी बैठका घेतल्या होत्या. ज्या बीएलओंनी पमध्ये मॅपिंग करणे, अस्पष्ट फोटो दुरुस्त करणे आणि दुबार नोंदी शोधण्याचे काम केले नाही, त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. त्यानुसार, तहसीलदार शीतल राजपूत यांच्या सूचनेवरून नायब तहसीलदार नवीनचंद्र भावसार यांनी फिर्याद दाखल केली आहे. जळगाव शहरात एकूण ३५८ बीएलओंची नेमणूक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे निवडणूक कामात दिरंगाई करणाऱ्या इतर कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

**केरळसाठी भाजपकडून......**

निवडणुकीत भाजपने कंबर कसली असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह भाजपच्या प्रचाराचे नेतृत्व करणार आहेत. पंतप्रधान मोदी, गृहमंत्री शाह तसेच भाजपची सत्ता असलेल्या राज्यातील मुख्यमंत्र्यांसह इतर वरिष्ठ नेते या राज्य दौऱ्यावर येणार आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी केरळमधील प्रमुख जिल्ह्यांचे वादळी दौरे करणार असून, आयोजित करण्यात येणाऱ्या सभांना संबोधित करून पक्ष कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करतील. भाजपची निवडणूक रणनीती कासारगोड, पालक्काड, तिरुवनंतपुरम, कोल्लम आणि त्रिशूर यांसारख्या राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या भागांमध्ये व्यापक संपर्क साधण्यावर लक्ष केंद्रित करणार आहे.

# चिमणी दिनानिमित्त माझं घर चिमणीचं घर अभिनव उपक्रम



प्रतिनिधी । जळगाव

**चिमणी दिनानिमित्त संत ज्ञानेश्वर विद्यालयात विविध उपक्रम उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांमध्ये चिमणी संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये माझं घर चिमणीचं घर हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.**

विद्यार्थ्यांनी आपल्या घराच्या परिसरात चिमण्यांसाठी पाण्याची भांडी ठेवली, दाणे टाकले तसेच काही विद्यार्थ्यांनी घरटी तयार करून चिमण्यांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण केले. तसेच जनजागृती उपक्रम यांचेही आयोजन करण्यात आले.

चिमणी वाचवा, निसर्ग वाचवा हा संदेश विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे मांडला. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण झाली. रूपाली आव्हाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून चिमण्यांचे पर्यावरणातील महत्त्व समजावून सांगितले.

# आदर्श शेतकरी पुरस्काराने सुरेश पाटील सन्मानित

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव तालुक्यातील वावडदे येथील शेतकरी सुरेश पाटील यांना आदर्श शेतकरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**




वावडदे येथील प्रगतिशील शेतकरी सुरेश हिम्मतराव पाटील यांनी त्यांच्या शेतात अनेक प्रकारचे प्रयोग करून कमी खर्चात अनेक वेळा जास्त उत्पन्न काढले. यांची दखल कृषी विभाग जळगाव परिषदतर्फे आदर्श शेतकरी पुरस्कार २०२५ - २०२६ हा पुरस्कार खासदार स्मिता वाघ व जळगाव पाणीपुरवठा व स्वच्छता तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील व जि.प.सीईओ मीनल करणवाल, अतिरिक्त जि.प.मुख्यकार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, जि.प.कृषी विकास अधिकारी पदनाभ म्हस्के, चंद्रकांत बोरसे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रगतिशील शेतकरी सुरेश पाटील यांनी सहकुटुंब स्वीकारला. यावेळी वावडदे येथील शिंदे गटातील शिवसेना जिल्हा उपप्रमुख नानासाहेब रवींद्र कापडणे व सामाजिक कार्यकर्ते, कृषी विभागातील वरिष्ठ अधिकारी, प्रगतिशील शेतकरी उपस्थित होते.

# पाचोरा येथे आज ज्ञानोत्सव; आ. किशोर पाटील यांची माहिती

प्रतिनिधी । पाचोरा

**येथील नर्मदा इंटरनॅशनल स्कूलच्या प्रांगणावर दि. २२ मार्च रोजी ज्ञानोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आमदार किशोर पाटील यांनी शिवालय संपर्क कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.**

यावेळी बाजार समितीचे सभापती गणेश पाटील, उपनगराध्यक्ष किशोर बारवकर, संजय गोहिल, प्रवीण ब्राह्मणे, वाल्मीक पाटील, स्वीय्य सहाय्यक राजेश पाटील आदी उपस्थित होते. आमदार किशोर पाटील यांनी गेल्या १४ ते १५ वर्षात नगराध्यक्ष ते आमदार या राजकीय कारकिर्दीत पाचोरा - भडगाव या दोन्ही शहरात अभूतपूर्व विकास कामे करून चेहरा मोहरा बदलून टाकला आहे. यासोबत मतदार संघाचा कायापालट केला. आणि आता शिक्षण क्षेत्रात आमदार किशोर आप्पा यांनी यांनी गरुडझेप झेप घेतली आहे. आ.किशोर पाटील पुढे म्हणाले की, राजकीय प्रवाहात आल्यापासून समाज कारणासाठी राजकारण करीत असताना जिनिंग प्रेसिंग, बांधकाम ठेकेदारी, स्टोन क्रेशर, नर्मदा ग्रो, सूतगिरणी अशा विविध व्यवसायांवरही लक्ष केंद्रीत



केले. या सोबतच ग्रामीण भागात सर्व अत्याधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण असे नवीन शैक्षणिक दालन उभे करावे, या विचारातून सीबीएससी पॅटर्नवर आधारित पाचोरा-भडगाव तालुक्यातील विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक पद्धती आधुनिक युगातील दर्जेदार शिक्षण, प्रशस्त प्रांगण, निसर्गरम्य वातावरण असलेली नर्मदा इंटरनॅशनल स्कूल सुरू करीत आहे. विद्यार्थी हाच कुटुंब व देशाचा आधारस्तंभ असतो. त्यांच्या सुप्त गुणांचा सर्वांगीण विकास व्हावा, उत्तम संस्कार व्हावेत, या विचारातूनच ग्रामीण भागातील परिपूर्ण शिक्षणाची सुविधा मिळावी या उदात्त हेतूने नर्मदा सीबीएससी इंटरनॅशनल स्कूलची उभारणी केली आहे.

दि.२२ मार्च रोजी सायं.५ वा.ज्ञानोत्सव सोहळ्याचे आयोजन केले आहे. बुलढाणा अर्बन बँकेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार असून या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संजय पाटील (मुंबई) व प्रमुख मार्गदर्शक सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा. गणेश शिंदे यांची उपस्थिती लाभली आहे. या कार्यक्रमास उपस्थितीचे आवाहन आमदार किशोर पाटील यांनी केले.

## आराध्या दुट्टे हिचे घवघवीत यश

प्रतिनिधी । शिरपूर

मुकेश आर. पटेल इंग्लिश मीडियम स्कूलची इयत्ता सातवीची विद्यार्थिनी आराध्या संदीप दुट्टे हिने आंतरराष्ट्रीय मॅथेमॅटिक्स ऑलिम्पियाड लेव्हल-२ च्या अंतिम निकालात ६० पैकी ५९ गुण मिळवत आंतरराष्ट्रीयस्तरावर २९ वा क्रमांक मिळवला. झोनल स्तरावर द्वितीय क्रमांक पटकावत तिने रौप्यपदक, प्रमाणपत्र, रोख पारितोषिक पटकावले. नॅशनल सायन्स ऑलिम्पियाडच्या अंतिम निकालात आराध्याने ६० पैकी ५५ गुण मिळवत राष्ट्रीयस्तरावर ३९ वा क्रमांक मिळवला.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# सेविका,मदतनीस-आशा कार्यकर्ती म्हणजे शासनाच्या योजनांचे आधारस्तंभ

## डीपीडीसीतून जळगाव जिल्हा १००% अंगणवाडी इमारती देणारा पहिला जिल्हा ठरणार : पालकमंत्र्यांचा विश्वास

प्रतिनिधी । जळगाव

**ग्रामीण भागातील आरोग्य, पोषण व जनजागृती यंत्रणा सक्षम करण्यात पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि आशा कार्यकर्त्यांचे योगदान अतुलनीय असून त्या शासनाच्या योजनांचे खरे आधारस्तंभ आहेत. त्या खऱ्या अर्थाने फ्रंटलाईन वॉरियर्स असून त्यांच्या माध्यमातून शासनाच्या योजना थेट घराघरात पोहोचतात, असे प्रतिपादन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.**



छत्रपती संभाजी राजे नाट्यगृहात हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी खासदार स्मिताताई वाघ, आमदार राजूमामा भोळे, अप्पर जिल्हाधिकारी हेमंत हारकर, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, जिल्हा ग्रामीण यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजू लोखंडे, महिला बालविकास अधिकारी हेमंत भदाणे, वर्षाताई भदाणे, गटविकास अधिकारी विनोद बोढरे, मंजुश्री गायकवाड यांच्यासह जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, मदतनीस व आशा कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

माता व बालकांच्या आरोग्याची जबाबदारी त्यांनी निष्ठेने पार पडत असून कोविडसारख्या कठीण काळातही जीवाची पर्वा न करता सेवा दिल्याने समाजात त्यांच्याबद्दल आदर अधिक दृढ झाला आहे. त्यांच्या समस्या सोडविण्यास शासन कटिबद्ध असून त्यांच्या कार्याला अधिक बळ देण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जातील, असे सांगून पालकमंत्री गुलाबराव पाटील पुढे म्हणाले की, गावाच्या विकासाची खरी ताकद म्हणजे या महिला कर्मचारी असून जिल्हा नियोजन समितीमार्फत मागील दोन वर्षांत २३१ अंगणवाडी इमारतींसाठी निधी देण्यात आला आहे. उर्वरित १५० अंगणवाड्यांचे बांधकाम पूर्ण करून जळगाव जिल्हा भविष्यात शंभर टक्के अंगणवाडी इमारती असलेला राज्यातील पहिला जिल्हा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमात तीन पर्यवेक्षिका, १९ अंगणवाडी सेविका, १९ मदतनीस आणि १५ आशा कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच वावडदे येथील शेतकऱ्याला आदर्श शेतकरी पुरस्कार देण्यात आला.


> डीपीडीसी अंतर्गत ५५० स्मार्ट अंगणवाड्यांना मंजुरी, २०० केंद्रांना स्वयंपाकासाठी भांडी, तसेच पंधराव्या वित्त आयोगातून २१७९ केंद्रांना लहान मुलांसाठी बनाना शेप बाक सुविधा देण्यात आली आहे. ३५० मिनी अंगणवाड्यांचे मोठ्या केंद्रांमध्ये रूपांतर करून बालविकासाला चालना देण्यात आली असून मुलांना डिजिटल व आधुनिक शिक्षण देण्याचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांच्या एक वर्षातील उल्लेखनीय कार्याचा शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला.

जिल्हा परिषद महिला व बालविकास विभाग मार्फत दिलेल्या विविध प्रशिक्षणांमधील यशस्वी प्रशिक्षणार्थी यांचादेखील यावेळी सन्मान करण्यात आला. हा सन्मान प्रेरणादायी असून शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेती सक्षम करावी, असे आवाहन पालकमंत्र्यांनी केले. सीईओ मीनल करणवाल यांनी सांगितले की, बालकांची सेवा हीच खरी सेवा, हाच खरा पुरस्कार असून प्रत्येकाने यापुढेही सेवाभावाने काम करण्याचे आवाहन केले. खा. स्मिता वाघ यांनीही सेविका, मदतनीस व आशा कार्यकर्त्या या ग्रामीण प्रशासनाचा कणा असल्याचे सांगत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.प्रास्ताविकात महिला व बालविकास अधिकारी हेमंतराव भदाणे यांनी पुरस्काराची माहिती दिली. सूत्रसंचालन पर्यवेक्षिका अनिता मुगल यांनी केले. आभार जामनेर येथील सीडीपीओ दमयंती इंगळे यांनी मानले.

# उन्हाच्या झळा कमी करण्यासाठी पुढाकार : जळगावात जलकुंड व परळ वाटपचा उपक्रम

प्रतिनिधी । जळगाव

**सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढली असून तापमान ४० अंशसेल्सिअसच्या पुढे गेले आहे. या कडक उन्हामुळे मोकाट जनावरे, पशू आणि पक्ष्यांना पाण्याअभावी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील सामाजिक कार्यकर्ते तथा व्यावसायिक रमेशकुमार मुनोत यांनी भूतदयेच्या भावनेतून जलकुंड आणि परळ मोफत वाटपाचा उपक्रम हाती घेतला आहे.**



या उपक्रमांतर्गत शहरात एकूण १५० जलकुंड आणि ५० परळ वितरित करण्यात येणार आहेत. नागरिकांनी हे जलकुंड सावलीच्या ठिकाणी ठेवून जनावरांना पाण्याची सोय करून द्यावी, असे आवाहन मुनोत यांनी केले आहे.

विशेष म्हणजे, ज्यांच्याकडे सावलीची जागा उपलब्ध नाही त्यांच्यासाठी बॅनरची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. समाजसेवेचा हा उपक्रम अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावा यासाठी, इच्छुक नागरिकांनी जलकुंड किंवा परळ मिळवण्यासाठी मो. ९३२५९२२३०५ या क्रमांकावर संपर्क साधून अगोदर नोंदणी करावी, असे आवाहनही रमेशकुमार मुनोत यांनी केले आहे. जलकुंड आणि परळ वाटप दि.२३ सोमवारपासून ओम् साई रिअल इस्टेट कन्सल्टन्स, शाहू नगर, याठिकाणी वाटप केले जाणार आहे.

## थोडक्यात

### मशीनमध्ये स्कार्फ अडकल्याने महिलेचा मृत्यू

**जळगाव ।** शहरातील एमआयडीसी परिसरातील एका कंपनीत काम करत असताना मशीनमध्ये स्कार्फ अडकल्याने गंभीर जखमी झालेल्या ४५ वर्षीय महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. जमुना रामकरण पाटील (रा. जामोद, जि. खंडवा, मध्य प्रदेश) असे मृत महिलेचे नाव आहे. जमुना पाटील आणि त्यांचे पती रामकरण पाटील हे एमआयडीसीमधील डी-६ सेक्टरमधील आर.सी.फूड या कंपनीत कामाला होते. १७ मार्च रोजी नेहमीप्रमाणे काम करत असताना जमुना यांच्या गळ्यातील स्कार्फ मशीनमध्ये अडकला. स्कार्फसह त्यांचे केसही मशीनमध्ये ओढले गेल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले होते. उपचार घेत असताना त्यांची प्राणज्योत मालवली.

### श्री नवनाथ महाराज पूजन, महाप्रसाद वाटप

**पारोळा ।** पारोळा शहरातील श्री नवनाथ मंदिरात आयोजित महाप्रसाद वाटप सोहळ्याप्रसंगी आ. अमोल पाटील उपस्थित होते. ॐ चैतन्य कानिफनाथ महाराज यांची पूजन व महाआरती करत आध्यात्मिक वातावरणाचा लाभघेतला. यानंतर भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्याचा मान आ. अमोल पाटील यांना मिळाला. या पवित्र कार्यक्रमाचे आयोजन पारोळा नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष दयाराम पाटील व नवनाथ मंदिर ट्रस्ट, पारोळा व सर्व सेवाभावी कार्यकर्त्यांनी सुंदररीत्या केले. याप्रसंगी लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील व नगरसेवक उपस्थित होते. कै. हरीनाथ महाराज यांच्या आशीर्वादाने हा सोहळा उत्साहात संपन्न झाला.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमासंदर्भात बैठक



प्रतिनिधी । जळगाव

**जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ पूर्वतयारी संदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती.**

या बैठकीत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी रोहन घुगे यांनी मतदार यादी शुद्धीकरणांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ बाबत सविस्तर माहिती दिली. या अनुषंगाने मतदारांचे मॅपिंग, फॉर्म १०५ सी भरणे तसेच फोटो अद्ययावत करणे इत्यादी कामे मोहिम स्वरूपात सुरू असल्याची माहिती देण्यात आली. तसेच जळगाव जिल्ह्याची प्रगती व नाशिक महसूल विभागातील कामगिरीचा तुलनात्मक आढावा सादर करण्यात आला.

या मोहिमेत सर्व राजकीय पक्षांनी सक्रिय सहभाग नोंदविण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. प्रत्येक पक्षाने अधिकाधिक बूथ लेव्हल एजंट (बीएलए) नियुक्त करून बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) यांना आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. तसेच सदर मोहिमेबाबत जनजागृती करण्याचेही निर्देश देण्यात आले. बैठकीदरम्यान उपस्थित प्रतिनिधींनी विचारलेल्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले.

# चिऊताई वाचल्यास निसर्ग वाचेन : डॉ. विलास नारखेडे

## उपक्रमातून बहिणाबाईच्या विद्यार्थ्यांनी नागरिकांना दिला पक्षी वाचवण्याचा संदेश

प्रतिनिधी । जळगाव

एक काळ होता. प्रत्येक घराघरात, अंगणात, छतावर चिमण्या आढळत. इवल्याशा पाखरांची काय ती लगबग असायची. पण आज परिस्थिती बदलली आहे. सिमेंटच्या या जंगलात, धावपळीच्या आयुष्यात चिमणीची गोड चिव चिव कुठेतरी हरवून गेली. २० मार्चला चिमणी दिन साजरा करताना तो औपचारिक दिवस नसून, पर्यावरणाचा एका महत्त्वाच्या घटकाला वाचवण्याचा एक आर्त टाहो आहे, असे प्रतिपादन बहिणाबाई विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. विलास नारखेडे यांनी केले.





> कृत्रिम घरटी लावा किंवा बाजारातील लाकडी तसेच तयार केलेली कृत्रिम घरटी बाल्कनी किंवा खिडकीत लावा. उन्हाळ्यात पाणी व अन्नाची सोय त्यांच्यासाठी करा. गच्चीवर जलपात्र ठेवा. त्यात बाजरी, तांदूळ व पोळीचे लहान तुकडे करून त्यांना खाण्यासाठी द्या. निंब, पेरू, जास्वंद यासारखे देशी झाडे लावा. तेथे चिमण्यांना आश्रय मिळतो. रासायनिक कीटकनाशकाचा वापर टाळा. बागेत, कुंडीत सेंद्रिय खताचा वापर केला तर चिमण्यांमध्ये वाढ होईल, असा उपक्रम विद्यालयात राबविण्यात आला.

बहिणाबाई, पवन ट्रस्ट व अर्पण सेवा ट्रस्ट आयोजित उपक्रमात चिमणी केवळ एक पक्षी नसून तो पर्यावरणाचा महत्त्वाचा एक दुवा आहे. चिमणी अनेक हानिकारक कीटक खाऊन शेतीचे रक्षण करतात. जर चिमण्या नष्ट झाल्या तर अन्नसाखळी विस्कळीत होईल व बीजप्रसाराचे कार्यही थांबेल म्हणून चिमण्यांना वाचवणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, असे सांगून डॉ. नारखेडे म्हणाले की, चिमण्यांचे संवर्धन प्रत्येक नागरिकांनी थोडासा प्रयत्न केल्यास चिमण्यांचा मंजूळ गोड किलबिलाट पुन्हा ऐकू येईल आणि पर्यावरणाचे संतुलनही टिकून राहील,असेही त्यांनी सांगितले. यावेळी स्वतः विद्यार्थ्यांकडून डॉ. विलास नारखेडे, राजेश वाणी, सीमा चौधरी, वैभव कुवर, महेंद्र पाटील, विशाल पाटील यांनी किल्ल्यांची ५२ घरटे बनवून घेतली व विविध झाडे व इतर ठिकाणी टांगण्यात आली. चिमण्यांना उन्हाळ्यात पिण्याचे पाणी मिळावे म्हणून ९७ विद्यार्थ्यांना पवन चॅरिटेबल ट्रस्ट, अर्पण सेवा ट्रस्ट यांच्यातर्फे परळ वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून जयश्री कोचुरे, प्रथमेश भोई, श्रद्धा वडनेरे, विवेक सोलंकी, दिसू सपकाळे, रिंकू सपकाळे, मिताली राठोड, गायत्री वेल, साजन पवार, गुंजन बाविस्कर या विद्यार्थ्यांनी नागरिकांना चिमण्या तसेच पक्षी रक्षणाचा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्वाती कोल्हे, डॉ. प्रतिभा राणे, संतोष सोनार, दुर्गादास कोल्हे यांनी प्रयत्न केले.

# गोदावरीच्या नाजनीन शेखने राष्ट्रपती भवनात जिंकली उपस्थितांची मने

## पर्पल फेस्टिव्हलमध्ये गायनाचे सादरीकरण

प्रतिनिधी । जळगाव

**येथील गोदावरी संगीत महाविद्यालयाची दिव्यांग नेत्रहीन विद्यार्थिनी नाजनीन तबस्सुम जमील शेख हिने आपल्या सुमधुर गायनाने नवी दिल्ली येथील राष्ट्रपती भवनातील अमृत उद्यानात आयोजित पर्पल फेस्टिव्हल मध्ये उपस्थितांची मने जिंकली.**

या सोहळ्याला भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. नाजनीनने सादर केलेल्या गणाधीशाय गुणमण्डिताय गीताने मंत्रमुग्ध होऊन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी तिचे विशेष कौतुक केले आणि तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. एका सामान्य पार्श्वभूमीतून आलेल्या दिव्यांग मुलीने थेट राष्ट्रपती भवनात आपल्या कलेचे प्रदर्शन केल्याने जळगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

नाजनीनच्या या देदीप्यमान यशाबद्दल गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, संचालक डॉ. वर्षा पाटील, डॉ. केतकी पाटील, डॉ. वैभव पाटील आणि प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रमोद भिरूड यांनी तिचे अभिनंदन केले आहे. तिच्या या यशामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांसमोर एक नवा आदर्श निर्माण झाला आहे.

जिद्द आणि मेहनतीचा प्रवास नाजनीन सध्या दीपस्तंभ फाउंडेशनच्या मनोबल प्रकल्पांतर्गत दिल्ली येथे गेली होती. ती सध्या दीपस्तंभ येथे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करत असून, तिच्या गायन कलेच्या कलागुणांना पैलू पाडण्याचे काम गोदावरी संगीत महाविद्यालय करत आहे.

गेल्या ३ वर्षांपासून ती महाविद्यालयाच्या प्राचार्या पद्मजा नेवे व इतर शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रीय संगीताचे शास्त्रशुद्ध धडे गिरवत आहे.

# अध्यात्म-तत्त्वज्ञानाची जोड सशक्त समाज निर्मितीसाठी आवश्यक : हभप जयवंत बोधले



प्रतिनिधी । जळगाव

**अध्यात्म व तत्त्वज्ञान यांची जोड सशक्त समाज निर्मितीसाठी आवश्यक असून ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथांचा अभ्यास प्रत्येकाने करावा, असे आवाहन ह.भ.प. जयवंत बोधले यांनी केले.**

> व्याख्यानात बोलताना ह.भ.प. जयवंत बोधले यांनी सांगितले की, भगवद्गीतेतील अनेक अनुत्तरित प्रश्नांची उकल ज्ञानेश्वरीतून होते. ज्ञानेश्वरीतील विचार सर्वसमावेशक असून ते प्रत्येक वयोगटासाठी मार्गदर्शक ठरतात. त्यांनी ज्ञानेश्वरीतील विविध अध्यायांतील ओव्यांचे अर्थ स्पष्ट करताना सुख आणि दुःख यांची संकल्पना उलगडून सांगितली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेअंतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्रातर्फे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी चिंतन या विषयावर दि. २० रोजी ह.भ.प. जयवंत बोधले यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य नरेंद्र नारखेडे, भाषा प्रशाळेचे संचालक प्रा.म.सु.पगारे, अध्ययन व संशोधन केंद्राचे विभागप्रमुख विजय आहेर आदी मान्यवर उपस्थित होते. अनुकूल व प्रतिकूल परिस्थितीमुळेच सुख-दुःख निर्माण होते, त्यामुळे सुखात हरखून जाऊ नये आणि दुःखात खचून जाऊ नये, असा संदेश त्यांनी दिला. तरुणांनी शिक्षणाबरोबरच संस्कार जोपासणे आवश्यक असून समाज प्रबोधनासाठी ज्ञानेश्वरीचे वाचन व चिंतन महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथात जीवनाचा सार दडलेला असून महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा लाभल्याचे सांगितले. आजचा समाज ऱ्हासाकडे झुकत असून तरुणाईने ज्ञानेश्वरीचे विचार आत्मसात करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. मन स्थिर ठेवण्यासाठीही ज्ञानेश्वरी मार्गदर्शक ठरते, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नरेंद्र नारखेडे यांनी केले. सूत्रसंचालन गौरव हरताळे यांनी तर आभार प्रा.म.सु.पगारे यांनी मानले.

# संघटनात्मक कार्यातून कर्मचाऱ्यांच्या समस्यांची होतेय उकल

## जय महाराष्ट्र शासकीय निम शासकीय कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष अशोक डहाळे यांचे मत

प्रतिनिधी । जळगाव

**कर्मचारी हा प्रशासनाचा अत्यंतिक महत्त्वाचा घटक असून त्याच्या असणाऱ्या समस्यांची उकल संघटनात्मक कार्यातून होत असते. संघटन कौशल्य नेतृत्वासाठी अत्यंत महत्त्वाचे असते आणि त्यासाठी जळगाव जिल्हा सतत कर्मचाऱ्यांच्या समस्या निवारण्यासाठी अग्रेसर असल्याचे मत जय महाराष्ट्र शासकीय निम शासकीय अधिकारी कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष अशोक डहाळे यांनी केले. संघटनेच्या आयोजित बैठकीप्रसंगी ते बोलत होते.**



गेल्या काही दिवसांपूर्वी लिपिक वर्गीय जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या झालेल्या आंदोलनाने त्यांच्या असणाऱ्या समस्या शासन स्तरावर मांडल्या गेल्या आणि यामुळे संघटनेच्या दृष्टिकोनातून ही बाब महत्त्वपूर्ण असून जळगाव जिल्हा परिषदेच्या सर्व लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांनी दाखविलेल्या एकजुटीमुळेच आंदोलन यशस्वी होऊ शकल्याचे मत जिल्हा पालक अध्यक्ष आर. टी. सोनवणे यांनी बैठकी प्रसंगी चर्चेत बोलताना व्यक्त केले.या बैठकीला नितीन पाटील, प्रमोद काळे, पुरुषोत्तम पाटील, पंकज पाचपोळ, किरण लाडवंजारी, गणेश पाटील, नयन गोहिल, सचिन विसपुते, संजय कोळी, अनिल चौधरी, जयवंत सावंते, विवेक अत्तरदे यांनी याप्रसंगी झालेल्या चर्चेत कर्मचाऱ्यांच्या असणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रयत्नशील राहण्यासंदर्भात चर्चा केली. या बैठकीस मेडिकल कॉलेज कर्मचारी, पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद कर्मचारी, लिपिक वर्गीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना आता मिळणार दिवसा वीज : पालकमंत्री

## विकासकामांचा धडाका - रस्ते, काँक्रिटीकरणासह इतर कामांचेही लोकार्पण, भूमिपूजन

प्रतिनिधी । जळगाव

**दोन वर्षांपूर्वी नंदगाव–फेसर्डी परिसरातील शेतकऱ्यांना दिलेला शब्द आज पूर्ण केला आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवणे हेच माझे कर्तव्य आहे. त्यांनी मागील काळातील आपल्या आंदोलनाच्या दिवसांची आठवण करून देत सांगितले की, पूर्वी शेतकऱ्यांच्या ट्रान्सफॉर्मर व वीज उपकेंद्राच्या प्रश्नांसाठी आम्ही आंदोलन केले. आज त्या प्रश्नांवर कायमस्वरूपी तोडगा काढत आहोत. शेतकऱ्यांसाठी पाणी, वीज आणि रस्ता या तीन मूलभूत गरजा अत्यंत महत्त्वाच्या असून त्यासाठी शासन सातत्याने काम करत आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.**



जळगाव–धरणगाव तालुक्यात सुमारे ३२ कोटींच्या निधीतून उपकेंद्र, रोहित्रे व लाईन सुधारणा सुरू आहे. नंदगाव उपकेंद्रामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा मिळणार असून ग्रामस्थांना २४ तास वीज उपलब्ध होणार आहे. भविष्यात गरज भासल्यास येथे ५ एमव्हीए क्षमतेचा अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येणार, अशी ग्वाही देत याशिवाय परिसरातील सुमारे १५० कोटींच्या भोकर पुलाचे काम प्रगतीपथावर असल्याची माहिती देत, सर्वसामान्यांच्या समस्या सोडवण्यासाठी मी नेहमीच तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, तुम्हीही विकासाच्या कामांना साथ द्या, असे आवाहन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.याप्रसंगी विष्णू भंगाळे, अनिल भोळे, पवन सोनवणे, शिवराज पाटील, गजानन सोनवणे, माजी सभापती राजेंद्र चव्हाण, कैलास चौधरी, वीज वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता दत्तात्रय साळी, उपकार्यकारी अभियंता विजय कपूरे, शाखा अभियंता पाटील दिनेश पाटील, चंद्रकिरण सोनवणे, दूध संघाचे रमेश आप्पा, दत्तू आबा सोनवणे, कमलाकर बोरसे, पाटील नवीन पाटील, कृष्णा सोनवणे, बापू धनगर, डॉ. कमलाकर पाटील, गोपाल जीभाऊ, शिवाजी सोनवणे, प्रमोद सोनवणे, योगेश लाठी, सरपंच रोहिणी साळुंखे, निलेश साळुंखे, पंकज चौधरी, योगेश पाटील, संदीप पाटील, नितीन सपकाळे, जितू पाटील, समाधान पाटील, नगरसेवक गणेश सोनवणे, हर्षल मावळे, अजय पाटील, शाखा अभियंता पाटील उपस्थित होते.

**महाराष्ट्र कृषी धोरण २०२० योजनेंतर्गत ४ कोटी खर्च करून उभारलेल्या नंदगाव येथे ३३/११ केव्ही क्षमतेच्या वीज उपकेंद्राचे लोकार्पण पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या उपकेंद्रामुळे परिसरातील शेतकऱ्यांना दिवसा वीज तसेच ग्रामस्थांना २४ तास अखंड वीजपुरवठा उपलब्ध होणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी नंदगाव येथील गावांतर्गत काँक्रिटीकरण (१५ लाख), पिलखेडा येथील स्मशानभूमी पोहोच रस्ता व गावांतर्गत काँक्रिटीकरण (३० लाख) या कामांचे लोकार्पण करण्यात आले. तसेच नंदगाव, फेसर्डी, किनोद ग्रा.मा. ४० या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ६० लाखांच्या कामाचे भूमिपूजनही पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.**

सूत्रसंचालन माजी सभापती राजेंद्र चव्हाण यांनी केले. प्रास्ताविक उपकार्यकारी अभियंता कपुरे यांनी केले.आभार विभाग प्रमुख गजानन सोनवणे यांनी मानले.

# चोपड्यात उत्साहपूर्ण वातावरणात ईद साजरी

## सर्व राजकीय पक्षातर्फे मुस्लिम बांधवांना शुभेच्छा

प्रतिनिधी । चोपडा

**येथे रमजान ईद हा सण मुस्लिम बांधवांनी मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरा केला. सकाळी चोपडा–शिरपूर रस्त्यालगत ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांनी सामूहिकरीत्या नमाज पठण करून एकमेकांना शुभेच्छा देत मोठ्या प्रेमभावाने ईद साजरी केली. तसेच जगात सुख–शांती नांदावी म्हणून मुस्लिम बांधवांनी अल्लाकडे प्रार्थना केली.**



नमाज पठणानंतर शिवाजी चौकात शिवसेना शिंदे गटाच्या पेंडालमध्ये मुस्लिम बांधवांना आ.प्रा.चंद्रकांत सोनवणे यांच्या उपस्थितीत मोठ्या प्रेमभावाने सदिच्छा भेट देवून शुभेच्छा दिल्या.तसेच काँग्रेस पक्षातर्फे अॅड.संदीप पाटील, राष्ट्रवादीच्या पेंडालमध्ये घनश्याम पाटील यांच्या उपस्थितीत मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी नगराध्यक्ष नम्रता पाटील, पाणी पुरवठा सभापती किशोर चौधरी, माजी उपनगराध्यक्ष विकास पाटील, स्वच्छता समिती सभापती रमेश शिंदे, गटनेते पीयूष चौधरी, नंदू गवळी, नगरसेवक हनीफसेठ, फरमान मिस्तरी, नगरसेवक युवराज अलकारी, माजी उपनगराध्यक्ष मेहमूदभाई बागवान, मजहर सैय्यद, सऊद बागवान, उद्योगपती रविंद्र बळीराम पाटील, मुख्तार सरदार, बाबु मिस्तरी, निजाम कुरेशी, मोईन कुरेशी, जमील वायरमन, कालूदादा, साजिद तेली, अॅड. शिवराज पाटील, सचिन पाटील, माजी नगरसेवक महेंद्र धनगर, नगरसेविका दीपाली विनोद चव्हाण यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## थोडक्यात

### नशिराबादला विरांना वंदन कार्यक्रमाचे आयोजन

**नशिराबाद ।** शहीद दिनानिमित्त देशासाठी आपले प्राण अर्पण करणाऱ्या शूर जवानांना अभिवादन करण्यासोबतच त्यांच्या कुटुंबियांच्या त्यागाचा गौरव करण्यासाठी नशिराबाद येथील स्वयंसंशोध फाउंडेशनतर्फे वीरांना वंदन- वीरपत्नी सन्मान सोहळा या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दि.२२ मार्च रोजी सकाळी १०वाजता राणी लक्ष्मीबाई सभागृह, न्यू इंग्लिश स्कूल, नाशिराबाद येथे पार पडणार आहे. कार्यक्रमात शहीद सैनिकांच्या वीर पत्नींना सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

# चोपडा ज्येष्ठ नागरिक संघात सन्मान सोहळा

प्रतिनिधी । चोपडा

**नाशिक येथे चोपडा ज्येष्ठ नागरिक संघाला फेस्कॉममार्फत राज्यातील उत्कृष्ट ग्रामीण संघ म्हणून पुरस्कार मिळाल्याबद्दल चोपडा नागरिक संघाचे अध्यक्ष जयदेव देशमुख यांचा चोपडा येथे आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य फेस्कॉमचे माजी अध्यक्ष डी.टी.चौधरी यांचे हस्ते स्मृतीचिन्ह व प्रशतीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.**



यावेळी ज्येष्ठ सदस्य रमणलाल गुजराथी, मधुकर आबा, रमेश शिंदे, जगन्नाथ गुरुजी, संघाचे उपाध्यक्ष नेरपगारे, श्याम गुजराथी, दिलीपराव पाटील, गोविंदा महाजन, संघ सचिव विलास पाटील, विलास सु.पाटील, गोविंदराव मराठे, एन.डी.महाजन, धर्मा मराठे, सुभाष गुरुजी, दतु गुरुजी, राजेंद्र साळुंखे, भगवान देशमुख, अरूण पाटील, एस.एम.पाटील, गोकुळ पाटील, श्री.शिसोदे, सि.एस पाटील, परशूराम पेंढारकर, आधार माळी, श्री.बोरसे, रामकृष्ण महाजन, खैरनार, डी.व्ही.पाटील, उपनगराध्यक्ष पंकज बोरोले यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शांताराम पाटील यांनी केले.

आभार विलास पाटील यांनी मानले. यशस्वीतेसाठी चोपडा ज्येष्ठ नागरिक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## आ.प्रा.चंद्रकांत सोनवणे–माजी आ.लताताई सोनवणे यांच्या प्रयत्नाचे फलित

# लासुर प्राथमिक आरोग्य केंद्र दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर

प्रतिनिधी । चोपडा

**आमदार प्रा.चंद्रकांत सोनवणे व माजी आमदार सौ.लताताई चंद्रकांत सोनवणे यांच्या प्रयत्नांनी लासुर येथील प्राथमिक आरोग्य केद्रांच्या दुरुस्तीचे काम जलदगतीने सुरू आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.**




या प्राथमिक आरोग्य केंद्रांची वास्तू व त्यामधील सर्व खोल्यांची दुरावस्था झाली होती. त्यामुळे आमदार महोदयांनी दुरुस्तीसाठी ३० लाख रुपये मंजूर केले होते. ते काम आज रोजी युध्दपातळीवर सुरू असून दरवाजे, खिडक्या, फ्लोरिंग, रंगरगोटीचे काम पुर्ण करण्यात आले. त्यामुळे या प्राथमिक आरोग्य केंद्र वास्तुचे आयुष्य वाढले असून रुग्णांना समाधानकारक वातावरण वाटू लागले आहे. परिणामी संपूर्ण लासुर परिसरातील ग्रामस्थ, महिला, युवक व शिवसैनिक आमदार सोनवणे दाम्पत्याचे मनापासून आभार व्यक्त करीत आहेत.

# इंधन दरवाढीचा उडाला भडका : वाहनधारकांचे बजेट कोलमडणार

प्रतिनिधी । जळगाव

घरगुती गॅस सिलिंडरच्या दरवाढीनंतर आता पेट्रोलच्या दरात ही वाढ झाल्याने सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित बिघडले आहे.

हिंदुस्तान पेट्रोलियम, इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियम या देशातील प्रमुख तेल कंपन्यांनी पेट्रोलच्या दरात वाढ जाहीर केली आहे. यामुळे शहरात पेट्रोलचा दर प्रति लिटर ११२.४५ रुपयांवरून ११४.५४ रुपयांपर्यंत पोहोचला आहे. दररोज कामानिमित्त प्रवास करणाऱ्या नागरिकांवर याचा सर्वाधिक परिणाम होणार आहे. दुचाकी वापरणाऱ्या नोकरदारांना महिन्याला ३०० ते ५०० रुपयांपर्यंत अतिरिक्त खर्च परिणामी सहन करावा लागू शकतो. विशेषतः घरपोहच डिलिव्हरी सेवा, छोटे व्यावसायिक आणि ग्रामीण भागातून शहरात ये–जा करणारे नागरिक यांना या वाढीचा मोठा फटका बसणार आहे. इंधन दरवाढीचा परिणाम अप्रत्यक्षरीत्या बाजार व्यवस्थेवरही पडण्याची शक्यता आहे.

# पर्यावरण रक्षणासाठी चिमण्यांचे जतन काळाची गरज : पंकज माध्यमिक विद्यालयाचा उपक्रम

प्रतिनिधी । चोपडा

**आजच्या आधुनिक काळात झपाट्याने कमी होत चाललेली चिमण्यांची संख्या ही चिंतेची बाब आहे. याच पार्श्वभूमीवर, दि.२० मार्च जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधून येथील पंकज माध्यमिक विद्यालयात सामाजिक वनीकरण विभाग व विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने चिमणी वाचवा अभियान राबविण्यात आले.**




या कार्यक्रमाच्या सुरुवातीला विज्ञान शिक्षिका वैशाली पाटील यांनी जागतिक चिमणी दिवसाचे महत्त्व विषद केले. वाढते शहरीकरण आणि मोबाईल टॉवर्सच्या रेडिएशनमुळे चिमण्यांचे अस्तित्व धोक्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यालयाचा विद्यार्थी श्रेयश पाटील याने आपल्या भाषणातून चिमण्यांची जीवनशैली आणि त्यांच्याबद्दलची रंजक माहिती सविस्तरपणे मांडली.

कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना वनपाल तुषार देवरे म्हणाले की, चिमण्या या केवळ पक्षी नसून त्या शेतकऱ्यांच्या खऱ्या मैत्रिणी आहेत. शेतातील कीड खाऊन त्या पिकांचे रक्षण करतात. त्यामुळे चिमण्यांचे संरक्षण करणे म्हणजेच पर्यावरणाचे संरक्षण करणे होय,असेही त्यांनी सांगितले.

मुख्याध्यापक व्ही.आर.पाटील यांनी चिमणी वाचवा अभियानाबाबत सखोल मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना आपल्या घराच्या परिसरात चिमण्यांसाठी पाणी व दाण्याची सोय करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी चिमण्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठी आणि त्यांच्या संवर्धनासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची सामूहिक जबाबदारी घेतली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्ग आणि पक्षी प्रेमाची भावना जागृत झाल्याचे पाहायला मिळाले.

# चोपडा तालुक्यातील शेतकऱ्यांची सह्याद्री फार्मला भेट

## सुधारित कापूस प्रकल्पांतर्गत विविध उपक्रमांची शेतकऱ्यांकडून पाहणी

प्रतिनिधी । चोपडा

**विठ्ठल आफ्रो बीसीआय संस्थेच्या अंतर्गत चोपडा तालुक्यातील विविध गावातील शेतकरी, महिला व कर्मचाऱ्यांनी सुधारित कापूस आदर्श पद्धत प्रकल्पांतर्गत मोहाडी, नाशिक येथील सह्याद्री फार्मच्या विविध उपक्रमांना भेटी देऊन माहिती जाणून घेतली. यात ५६ पुरुष व ४४ महिलांचा समावेश होता.**




शेतकऱ्यांच्या हितासाठी उभी राहिलेली सह्याद्री फार्म लहान व मध्यम शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांना बाजारपेठ, तंत्रज्ञान आणि योग्य दर मिळवून देणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. २२०००+ शेतकरी या संस्थेशी जोडले गेले आहेत. ४००० पेक्षा अधिक पुरुषांना तसेच महिलांना ह्या ठिकाणी रोजगार प्राप्त झाला आहे.सह्याद्री फॉर्म्सच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, दर्जेदार बियाणे, मार्गदर्शन आणि उत्पादनाची थेट विक्री करण्याची संधी मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांचा नफा वाढतो आणि त्यांचे आर्थिक जीवनमान सुधारते. या संस्थेमार्फत द्राक्षे, टोमॅटो, डाळिंब, केळी, आंबा अशा विविध पिकांचे उत्पादन घेतले जाते. येथे उत्पादित मालावर प्रक्रिया करून जॅम, ज्यूस, पल्प, फ्रोझन पदार्थ तयार केले जातात. त्यामुळे उत्पादनाला अधिक मूल्य मिळते आणि बाजारपेठही वाढते.सह्याद्री फार्म्सकडे अत्याधुनिक पॅकहाऊस, कोल्ड स्टोरेज आणि प्रोसेसिंग युनिट्स आहेत. या सुविधांमुळे उत्पादनाची गुणवत्ता टिकून राहते आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्यात करणे सोपे होते. भारतासह अनेक देशांमध्ये या संस्थेची उत्पादने पोहोचत आहेत. या भेटीदरम्यान शेतकऱ्यांना शेतीतील संपूर्ण व्हॅल्यू चेनबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. पिक नियोजन, लागवड, काढणी, ग्रेडिंग, पॅकिंग, साठवणूक तसेच निर्यात प्रक्रिया या सर्व टप्प्यांचा प्रत्यक्ष अनुभव शेतकऱ्यांना मिळाला. या भेटीमध्ये प्रकल्प व्यवस्थापक संजय देशमुख, चारही पी यु मॅनेजर तसेच कॉर्डिनेशन कमिटीचे सदस्य विविध गावातील शेतकरी व महिला तसेच कृषिमित्र व कृषी सखी उपस्थित होते.

# कोळी महासंघाच्या महत्वपूर्ण विषयाची दिल्लीत दखल

## राष्ट्रीय अध्यक्ष माजी आ. रमेश पाटील यांच्या प्रयत्नांना यश

प्रतिनिधी । चोपडा



**बीएसएनएल मधील महाराष्ट्रातील काही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे जातीच्या दाखल्यासंदर्भातील प्रकरणांमुळे सेवानिवृत्तीचे लाभ रोखण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर कोळी महासंघाने दखल घेत राष्ट्रीय अध्यक्ष माजी आ. रमेश पाटील व कोळी महासंघाचे नेते सुभाष कोळी यांनी दिल्ली येथे केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची भेट घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा केली.**

केंद्रीय मंत्र्यांनी या प्रकरणाची दखल घेत योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. कोळी महासंघाने घेतलेल्या या महत्वपूर्ण विषयाला यश मिळणारच असा विश्वास महाराष्ट्रातील बीएसएनएलमधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला. तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय मंत्र्यांना दिलेल्या सकारात्मक पत्राचीही नोंद घेण्यात आली आहे.